# सावदा नगरपरिषद, सावदा जि.जळगाव

## ई-निविदा सुचना

मुख्याधिकारी सावदा नगरपरिषद जि.जळगांव यांचेकडून १५/१६ वा वित्त आयोग/वैशिष्ट्यपूर्ण योजना/न.प.निधी/इतर शासकीय अनुज्ञेय निधी अंतर्गत नागरी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी अधिनियम २०१६ अन्वये सावदा नगरपरिषदेच्या हद्दीत निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे वर्गीकृतरित्या संकलन, वाहतूक व प्रक्रिया करणेकामी अनुभवी अभिकर्त्याची नियुक्ती करणे या कामी शासनमान्य, नोंदणीकृत व पात्र संस्थेव्दारे खालील कामाच्या ई-निविदा प्रणालीव्दारे निविदा मागविण्यात येत आहे. या निविदेच्या अर्हता अटी व सविस्तर निविदा सुचना शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करता येतील.

| अ.क्र | कामाचे नाव | इसारा रक्कम | निविदा संच फी | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | १५/१६ वा वित्त आयोग /वैशिष्ट्यपूर्ण योजना//न.प.निधी/इतर शासकीय अनुज्ञेय निधी अंतर्गत नागरी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी अधिनियम २०१६ अन्वये सावदा नगरपरिषदेसाठी प्रत्येक घराघरातून व व्यावसायीकाकडून (Door to Door) घनकचरा (ओला कचरा, सुका कचरा व घरगुती घातक कचरा) विलगीकरण करुन बंदीस्त वाहनाव्दारे गोळा करुन घनकचरा प्रक्रिया केंद्रापर्यत वाहून नेणे व शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करणे. सार्वजनिक कचरा कुंड्या, मटन मार्केट, भाजी मार्केट, शॉपींग कॉम्प्लेक्स, कचऱ्याचे ढिग, गटारीतील उपसलेला गाळ, बांधकाम राडा रोडा (Construction & Demolition Waste) आदी ठिकाणचा दररोज कचरा गोळा करुन बंदीस्त वाहनाव्दारे गोळा करुन घनकचरा प्रक्रिया केंद्रापर्यत वाहून नेणे. स्वच्छ सर्वेक्षण आणि शासनाच्या स्वच्छता विषयी धोरणाप्रमाणे नागरीकांमध्ये ओला कचरा व सुका कचरा याबाबत जनजागृती करणे तसेच तात्काळची सर्व कामे करणे बंधनकारक राहील. | रक्कम रु. १,२०,०००/- | रक्कम रु. १२,०००/- | ३ वर्ष |

अटी व शर्ती :-

१) पुर्ण निविदा ई निविदा प्रक्रियेव्दारे करावयाची आहे. निविदेबाबतच्या पुढील तपशिलासाठी कृपया www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर भेट द्यावी.

२) निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध होण्याचा व स्विकृतीची दि. १५/०५/२०२६ सकाळी ११.०० वा ते दि.२९/०५/२०२६ दु. १५.०० वाजेपर्यंत करता येईल. सदर निविदा दि. ०१/०६/२०२६ रोजी दु. १५.०० वाजता किंवा प्रशासकिय सोईनुसार उघडण्यात येतील.

३) कंत्राटदाराने त्यांच्या नोंदणी संबंधीचे सर्व कागदपत्रे पी. डी. एफ. स्वरुपात तसेच निविदा संच फी व इसारा (EMD) रक्कम महाटेंडरव्दारे केवळ Online स्वरुपात जमा करावी. या दोन्ही भरणा संबंधीचे दस्ताऐवज स्कॅन केलेल्या स्वरुपात ई निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. सदर कागदपत्रांची हार्डकॉपी ११/०५/२०२६ ते २५/०५/२०२६ पर्यंत इकडील कार्यालयाकडे सादर करावी.

४) निविदेचे वेळापत्रक सविस्तर माहिती साठी www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर पहावे.

५) निविदाधारकाने शहराची लोकसंख्या, निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण, परिस्थिती नुसार कचऱ्यातील घटक, कचरा प्रक्रिया केंद्राचे शहरापासुनचे अंतर, खत निर्मीती प्रकल्प इ. बाबीं बाबत अधिक माहितीसाठी नगरपरिषद कार्यालयातील आरोग्य विभागास विहीत मुदतीत प्रत्यक्ष भेट देऊन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

**६) सदर कामाचे दर हे सर्व करांसह (Bill of Quantity) BOQ मध्ये योग्य त्या ठिकाणी नमुद करावे. लिफाफा क्र. १ मध्ये दर नमुद केल्यास सदर निविदा धारकाची निविदा रद्द करण्यात येईल.**

७) सादर केलेले कागदपत्रे खोटी किंवा दिशाभूल करणारे असल्याचे दिसून आल्यास निविदा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी नगरपरिषद यांनी राखुन ठेवला आहे.

८) प्राप्त निविदापैकी कोणतीही निविदा स्विकारण्याचा अथवा कोणतेही कारण न देता सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार नगरपरिषदेने राखुन ठेवला आहे. तसेच अटी व शर्ती मध्ये नियमानुसार बदल करण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांना राहिल.

९) निविदा धारकांनी निविदा सादर करतांना खालीलप्रमाणे दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करावा.

अ) लिफाफा नं. १ मध्ये -

१) टेंडर फॉर्म फी व बयाणा रक्कम ऑनलाईन भरलेल्या चलनाची प्रत अपलोड करणे आवश्यक आहे.
२) पॅन क्रमांक, जी. एस. टी. प्रमाणपत्र व GSTR-3B, Professional Tax नोंदणी प्रमाणपत्र इ. आवश्यक असलेले प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक आहे.
३) शासनमान्य सक्षम खात्यांचे नोंदणी प्रमाणपत्र अपलोड करावे.
४) MJP चे नोंदणीकृत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
५) नगरपालिकेच्या घनकचरा विषयक निविदेत नमूद असलेले काम केल्याचा कमीत कमी ५ नगरपंचायत/ नगरपरिषदांकडील अनुभवाचा दाखला सादर करणे बंधनकारक आहे.
६) घनकचरा विषयक तीन नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमधील कोणत्याही एका स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये मधील कोणत्याही एका स्थानिक स्वराज्य संस्थेमधील अखंडीत तीन वर्षाचा अनुभव प्रमाणपत्र.
७) संस्थेची ISO 9001:2015 नोंदणी असणे बंधनकारक आहे.
८) मागील ६ महिन्याचे कामगार कल्याण निधी भरल्याची पावती.
९) मक्तेदार यांचे मागील ३ वर्षातील उलाढाल ५ कोटी रुपये असावी. तसा सी.ए चा अहवाल सोबत जोडलेला असावा. ( Bid Capacity On CA Letterhead )
१०) सदरील कामाविषयी प्लॉस्टिक व स्टील क्राफ्ट कारखान्यासोबत १००/- रु.च्या मुद्रांकावर नोटरी करारपत्र
११) कमीत कमी १ नगरपरिषद/ महानगरपालिका मध्ये खत निर्मितीचे काम समाधानकारकरित्या पूर्ण केलेले असून खत विक्रीची पावती व हरित ब्रँड मिळवून दिले बाबत संबधीत नगरपरिषद/ महानगरपालिका मध्ये काम केल्याचा अनुभव दाखला.
१२) मागील ३ वर्षाचे आयकर विवरण प्रमाणपत्र
१३) अधिकृत CA चे मागील ३ वर्षाचे ऑडीट रिपोर्ट UDIN नंबरसह
१४) नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेच्या वतीने करण्यात येणा-या संविदेमध्ये नगरपरिषदेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबध किंवा आमच्याशी भागिदारी नाही. याबाबतचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र रु. १००/- च्या स्टँम्पपेपरवर सादर करणे आवश्यक राहिल.
१५) १ कोटी रक्कमेची वैध बँकेचे Solvency Certificate जोडणे बंधनकारक आहे.
१६) शहराची प्रत्यक्ष पाहणी करुन तसेच सावदा नगरपरिषद घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची प्रत्यक्ष स्थळपाहणी करुन सदरील कामाचा GPS फोटोसह कृती आराखडा सादर करण्यात यावा व कृती आराखडा सादर केल्याबाबतचे सावदा नगरपरिषदेचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे.
१७) Networth Certificate on CA letterhead
१८) संयुक्त भागीदारी असल्यास सोबतचा करारनामा जोडण्यात यावा.
१९) मक्तेदाराने EPF नोंदणी प्रमाणपत्र व कमीत कमी प्रती महिना ५० कामगारांचे मागिल १२ महिन्यांचे भरणा करण्यात आलेले चलन अपलोड करणे आवश्यक आहे.
२०) मक्तेदाराने Employee State Insurance Scheme चे नोंदणी प्रमाणपत्र, तसेच मागिल १२ महिन्यांचे भरणा करण्यात आलेले चलन अपलोड करणे आवश्यक आहे.
२१) **Annexture-II** हे निविदाधारकाच्या लेटर हेडवर सही व शिक्यासह सादर करणे बंधनकारक आहे.
२२) निविदा धारकाच्या वतीने कोणास प्राधिकृत केले असल्यास त्या बाबतचे पॉवर ऑफ अॅटर्नी देणे बंधनकारक राहील.

**ब) लिफाफा नं. २ मध्ये -**

**BOQ (Bill of Quantity)**

१) लिफाफा नं. १ उघडुन त्या मधिल कागद पत्रांची तपासणी करुन वरिल प्रमाणे आवश्यक ती कागदपत्रे असल्याची खात्री केल्या नंतरच लिफाफा नं. २ उघडण्यात येईल अन्यथा त्या निविदेचा विचार केला जाणार नाही. तसेच निविदा धारकांचे नमुद करण्यात येणारे दर समान आल्यास सदर कामी ज्या निविदा धारकाचे कामाचे अनुभव तांत्रिक बाबतीत जास्त असेल त्या निविदा धारकास कामकाज देण्यात येईल व यात काही वाद निर्माण झाल्यास मुख्याधिकारी, सावदा नगरपरिषद सावदा यांचा निर्णय अंतिम असेल.
२) केंद्र व राज्य शासनाच्या नियमाप्रमाणे अनुज्ञेय प्रचलित कर वा दरानुसार तसेच भविष्यात लागू करण्यात येणारे दरानुसार रककम बिलातून कपात करण्यात येईल.
३) कार्यादेश दिल्यानंतर कामासंबंधी काही वाद निर्माण झाल्यास सावदा नगरपरिषद निर्णय घेईल.
४) कामाचा दर्जा राखणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.
५) ज्या निविदाधारकाची निविदा मंजुर होईल त्यांनी विहीत नमुन्यात व विहीत किमतीच्या स्टॅम्प पेपरवर स्व:खर्चाने करारनामा करुन द्यावा लागेल.
६) काळ्या यादीत समाविष्ट असलेल्या मक्तेदारांना या निविदा प्रक्रियेत सहभाग घेता येणार नाही.

# सविस्तर अटी व शर्ती :-

***घर ते घर कचरा संकलन व वाहतूक***

१) सावदा नगरपरिषदेच्या हद्दीत येणाऱ्या घर, दुकान, हॉटेल, रेस्टॉरंट, खानावळी, मटन-चिकन मासे शॉप, शासकीय नीम-शासकीय कार्यालये, संस्था, मंगल कार्यालय व इतर कचरा निर्माण होईल अशी नगरपरिषद क्षेत्रातील प्रत्येक आस्थापना असे सर्व घर या संस्थेत असेल.

२) संपूर्ण नगरपरिषदेच्या हद्द क्षेत्रातील वर नमूद केल्या ठिकाणहून दैनंदिन रित्या विलगीकृत स्वरुपात वेगवेगळ्या कप्प्यात ओला (कुजणारा) व सुका (न कुजणारा) तसेच घरगुती घातक कचरा असा संकलित करून वाहतूक करून नगरपरिषद घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प गट न. १४०७, स्टेशन रस्ता, सावदा येथे पोहोच करावा लागेल.

३) ओला कचरा (कुजणारा) म्हणजे भाजीपाला व फळे वेस्टज, शिळे अन्न पदार्थ, पालापाचोळा, अंड्याचे कवच, केस, नखे, निर्माल्य असे सर्व कुजणारे पदार्थ.

४) सुका कचरा (न-कुजणारा) म्हणजे

१) प्लास्टिक वस्तू, पिशव्या, कॅरीबॅग, बाटल्या.

२) कागद व पुठ्ठा.

३) काच ग्लास, बाटल्या.

४) धातू - खिळे, तार, भांडी, पत्रीडबे, चमचे.

५) लेदर - रेग्झीन, फोम, रबर, बॅगा, चपला, बूट, टेबलक्लॉथ, मॅटींग, सोफा, चेअर, सीट, सीट कव्हर.

६) कापड - कपडे, गाद्या, उश्या, टक्के, चादर, ब्लॅकेट, कापूस, ड्रेस, ड्रेस मटेरियल व साड्या.

५) घरगुती घातक कचरा म्हणजे

१) सॅनीटरी नॅपकीन, डायपर

२) ट्यूब लाईट, बल्ब, इलेक्ट्रॉनिक व इलेक्ट्रीकल साहित्य, बॅटरीज वगैरे

६) हॉटेल, रेस्टॉरंट, खानावळी, मंगल कार्यलय येथील कचरा संकलित करणेकामी स्वतंत्र वाहन व स्वतंत्र रूट असावा.

७) दैनंदिनरित्या नगरपरिषदेच्या हद्दीत घर ते घर संकलन करतांना नगरपरिषद हद्दीच्या क्षेत्रातील संपूर्ण कचरा संकलन होणेकामी ज्या भागात वाहन जाऊ शकत नाही अशा भागातील कचरा संकलन होणेकामी सायकल रिक्षा किंवा हातगाडी लावण्यासारख्या योग्य ती उपाय योजना करावी लागेल याकामी आवश्यक साहित्य यंत्रसामग्री मक्तेदारास स्वखर्चाने उपलब्ध करून दयावी लागेल.

८) नागरिकांमध्ये माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करुन घराघरातील व शहरातील ओला व सुका कचरा वेगवेगळा करणेबाबत प्रबोधन करणे अपेक्षित आहे.

९) नागरिकांना घंटागाडीचे अवलोकन होईल यासाठी घंटागाडीवर ऑडीओ क्लिप व लाऊड स्पीकर यांच्या सहाय्याने अनाऊन्समेंट करणेची यंत्रणा वाहनांवर बसविण्यात आलेली असुन यंत्रणा सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल.

१०) कचरा संकलन व वाहतूक करतांना प्रत्येक वाहनावर वाहन चालवण्याचा अद्ययावत परवाना धारक वाहन चालक असावा. त्यासोबत मदतनीस व कचरा संकलन सहाय्यक (आवश्यक्ते नुसार) असे कर्मचारी असावेत. तसेच वापरात येणाऱ्या सर्व वाहनांकडून परिवहन विभागाकडील वाहतूक नियमांचे तंतोतंत पालन होणे आवश्यक असेल.

११) कचरा संकलन वाहतूक व प्रक्रिया दररोज करावयाची असून यात कोणतेही दिवशी सुटी असणार नाही. ही सेवा अखंडित असावी लागेल.

१२) घंटागाडीस नेमून दिलेल्या भागामधील प्रत्येक घराघरातील कचरा १०० % संकलित करणे आवश्यक आहे. **उर्वरीत आवश्यकतेनूसार घंटागाड्या ह्या मक्तेदारांनी आपल्या स्तरावरुन लावायच्या आहेत.** सदर काम करतांना ओला कचरा व सुका कचरा वर्गीकृतरीत्या संकलीत करणेकरीता प्रत्येक गाडीवर ड्रायव्हर सह आवश्यक इतके कर्मचारी नेमणे आवश्यक आहे. जेणेकरुन कचरा गोळा करतांनाच त्याचे वर्गीकरण होईल. अन्यथा मक्तेदारास संकलीत केलेल्या कच-याचे प्रक्रिया केंद्रावर स्वखर्चाने वर्गीकरण करुन द्यावे लागेल. त्याचा सर्व खर्च संबंधित कंत्राटदाराने करायचा आहे. तसेच घातक कच-यासाठी नगरपरिषदेकडुन सुरुवातीस एक लाल रंगाची डस्ट बिन पुरविली जाईल. ती शेवटपर्यंत सांभाळण्याची जबाबदारी मक्तेदाराची असेल. तिची तुटफुट झाल्यास त्याची भरपाई करुन घेण्यात येईल व नव्याने डस्टबिन पुरविण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१३) प्रत्येक घंटागाडीवर शेरेबुक ठेवण्याची व्यवस्था कंत्राटदाराने करावी त्यामध्ये प्रत्येक भागातील नागरीकांचे दैनंदिन अभिप्राय नोंदविणे बंधनकारक आहे.

१४) संकलीत करण्यात आलेल्या कचऱ्याचे प्रक्रीया केंद्रावर संपुर्ण विलगीकरणाअंती प्रती वाहन प्रती ट्रीप वजन करून नोंद ठेकेदारास ठेवावी लागेल.

१५) नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पावर वजन काटा बसविण्यात आलेला आहे, वजन काट्यावर नगरपरिषदेने नेमलेल्या कर्मचाऱ्याचे वेतन आपले मासिक देयकातून कपात करण्यात येईल. वजन काट्याच्या वजनाबाबतच्या संगणकीय पावत्या अथवा पावत्यांचा अहवाल असल्याशिवाय बिलाची अदायगी करण्यात येणार नाही. तसेच झालेल्या कामाचे बिल व सोबत आवश्यक कागदपत्रासह नगरपरिषदेस प्रत्येक महिन्याच्या विहित केलेल्या तारेखपर्यंत सादर करावेत. उशिरा बिल सादर केल्यास व त्यामुळे मोबदला मिळण्यास उशिर झाल्यास नगरपरिषद जबाबदार राहणार नाही. त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

१६) नगरपरिषदेच्या आवश्यकतेनुसार वेळोवेळी कामात केलेले बदल आपणास सुचविण्यात येतील. व त्यानुसार अंमलबजावणी करणे आपणास बंधनकारक राहील. तसेच आपले काम असमाधानकारक आढळून आल्यास आपणास पूर्व सुचना न देता आपला मक्ता रद्द करणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

१७) शासनाच्या वेळोवेळी येणारे शासन निर्देश व सुचनांचे पालन करणे. स्वच्छ सर्व्हेक्षण व कचरा मुक्त शहर(GFC Ranking) कार्यक्रमांतर्गत नगरपरिषदेने सुचविल्याप्रमाणे आपणांस काम करणे बंधनकारक असेल.

१८) गोळा केलेल्या घनकचऱ्या मधील प्लास्टिक कचऱ्याची विल्हेवाट लावण्या साठी स्थानिक प्लास्टिक वेचक/भंगार खरेदीदार संस्था / व्यक्ती यांना सामावुन घेणे अपेक्षित आहे.

१९) घनकचरा व्यवस्थापनाचे काम अत्यावश्यक सेवेमध्ये येत असल्याने कंत्राटदारास ठेका बंद करता येणार नाही. तसे केल्यास अनामत रक्कम जप्त करण्याचा तसेच ठेकेदारास ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्याचा अधिकार नगरपरिषदेस राहील.

२०) ठेकेदाराच्या ठेक्याचा कालावधी संपले नंतर सदरचा करार संपुष्टात येईल, भविष्यात या कामासाठी कोणताही हक्क ठेकेदारास किंवा त्यांच्या कर्मचा-यांस नोकरी मागण्याचा अधिकार असणार नाही.

२१) ज्या दिवशी आपले काम बंद राहिल त्या दिवसाचा मोबदला देण्यात येणार नाही. संपूर्ण कचरा संकलन व वाहतूक बंद राहिल्यास प्रती दिवस रक्कम रुपये ५०००/- प्रमाणे दंडनीय कार्यवाही करणेत येवून सदरची रक्कम त्या महिन्याच्या बिलातुन कपात कारण्यात येईल. तसेच शहरातील ठरवून दिलेल्या मार्गाप्रमाणे कचरा संकलन करणारी वाहने बंद राहिल्यास प्रतिदिन प्रति घंटागाडी ५०० रु. दंडाची रक्कम बिलातून वसूल केली जाईल.

२२) कचरा वाहतुकीबाबत नागरिकांच्या, व्यावसायीकांच्या तक्रारी येणार नाहीत अशा प्रकारे बंदिस्त वाहनातून कचरा वाहतूक करावयाची आहे. वाहतुकीच्या वेळी कचरा रस्त्यावर सांडणार नाही याची खबरदारी कंत्राटदाराने घ्यावयाची आहे.

२३) शहरातील रस्ते झाडून जमा झालेला कचरा, लहान व मोठ्या नाल्यांमधील उपसलेला गाळ, तसेच सार्वजनिक कचरा कुंड्या, मटन मार्केट, भाजी मार्केट, शॉपिंग कॉम्प्लेक्स येथील कचरा आदी ठिकाणचा कचरा दररोज संकलित करुन नियोजीत ठिकाणी स्वतंत्र वाहनाने पोहच करुन त्यावर योग्य ती नियमोचित प्रक्रिया करुन विल्हेवाट लावावी लागेल.

२४) स्वच्छ सर्वेक्षण, स्टार रेटींग इ. अभियानामधील कामांकरीता मुख्याधिकारी यांचे आदेशानुसार कामे करणे आवश्यक आहे.

२५) मक्त्यांतर्गत येणा-या सर्व कामांचे GPS फोटो दैनंदीनरित्या सादर करणे बंधनकारक राहील.

२६) ICT BASED प्रणाली अंतर्गत घनकचरा संकलनविषयक सावदा शहरातील सर्व मालमत्तांची दैनंदिन बारकोड स्कॅन करणे बंधनकारक राहील अन्यथा प्रतिदिन प्रति ID २००/-रु. प्रमाणे दंड आकारण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

२७) सावदा नगरपरिषद हद्दीतील लहान-मोठे गटारी व लहान-मोठे नालेचा गाळ स्वखर्चाने जे.सी.बी किंवा मजूर लावून उपसून घेवून घनकचरा व्यवस्थापन केंद्र येथे पोहच करणे बंधनकारक राहील याकामी आपण सादर केलेल्या प्रती टनप्रमाणे देयक अदा करण्यात येईल.

**मृत जनावरे :-**

१) नगरपरिषदेच्या हद्दीतील कोणतीही मृत जनावर विल्हेवाटीची तक्रार प्राप्त झाल्या पासुन तात्काळ उचलून सदर मृत जनावर नगरपरिषदेने सुचविलेल्या घनकचरा प्रकल्पाच्या उर्वरीत जागेत विहित पद्धतीने (**DEEP BURINAL METHOD**) विल्हेवाट लावणे ठेकेदारावर बंधनकारक राहिल.

२) दररोज प्राप्त तक्रारीची दैनंदिन रित्या नोंद ठेवून व त्याची पुर्तता झाल्याबाबत सही घेणे आवश्यक असेल. सदरील कार्य करतांना आवश्यक ते जंतुनाशक नगरपरिषदकडुन उपलब्ध करून देण्यात येईल.

**बांधकाम राडा रोडा Construction & Demolition Waste :-**

१) सावदा नगरपरिषदेच्या हद्दीतील जुने बांधकामाचा राडा रोडा नगरपरिषदेच्या सुचनेनुसार सुचविलेल्या जागेवर पोहोच करणे बंधनकारक आहे.

२) सदरचा बांधकाम राडा रोडा त्याच दिवशी नियोजीत ठिकाणी स्वतंत्र वाहनाने पोहच करावे लागेल.

३) बांधकाम राडा रोडा याची स्वतंत्र नोंद ठेवण्यात यावी.

**वाहने :-**

१) नगरपरिषदेकडुन भाड्याने पुरविण्यात आलेली वाहने ज्या स्थितीत पुरविण्यात आली ती करार संपल्यावर सर्वसामान्यपणे घसारा वगळुन वाहने ज्या स्थितीत पुरविण्यात आली होती त्या स्थितीत परत करावी लागतील. सदर वाहनांना JCB सह लागणारे इंधन, ड्रायव्हर व कर्मचारी स्वत: पुरवावे लागतील.

२) नगरपरिषदेकडून उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या घंडागाडी/वाहनांचा तपशील

| अ.क्र. | वाहनाचा तपशिल | नग |
|---|---|---|
| १ | Piaggio Four Wheeler | ३ |
| २ | Piaggio Three Wheeler | २ |
| ३ | Tractor with Trolly | २ |
| ४ | Mini Tractor | २ |
| ५ | JCB (२DX Backhoe Loader) | १ |

३) तथापि वाहने ज्या दिवशी नगरपालिका स्वत:च्या कामासाठी वापर करेल त्या दिवसाचा इंधन व चालक खर्च नगरपालिका करेल. नगरपरिषदेने निश्चित केलेल्या मोटार गॅरेजमध्ये नगरपरिषदेने पुरविलेल्या वाहनाची देखभाल व दुरूस्ती वेळोवेळी नगरपरिषद अधिका-यांचा सुचनेनुसार करून घ्यावी लागेल. त्यात हयगय केल्यास प्रतिदिन ५०० रु. प्रतिवाहन प्रमाणे दंड आकारण्यात येईल. वाहने व संयत्रे यासाठी स्वखर्चाने डिझेल व ऑइल वापरावे. सदर वाहनाच्या नियतकालिक देखभाल दुरूस्तीचा(बॅटरी व टायर बदल करणे व्यतिरिक्त) संपूर्ण खर्च ठेकेदारास स्वत: करावा लागेल. निश्चीत केलेल्या मोटार गॅरेजच्या माहितीवरून वाहनाचा वापर योग्य होत नसल्याचे प्रशासनाच्या निर्दशनास आल्यास आपणावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल व सदर वाहने नगरपरिषद स्वत: जमा करुन घेईल. बॅटरी व टायर चे क्रमाकांची नोंद केल्याची खात्री करणेची जबाबदारी आरोग्य निरिक्षक, शहर समन्वयक व ठेकेदार यांची राहील.

४) नगरपरिषदेने पुरविलेल्या वाहनांची सुरक्षा व पार्किंग जबाबदारी ठेकेदाराची असेल. नगरपरिषदेमार्फत पुरविणेत येणा-या वाहनांचे व यंत्रसामुग्रीचे सेवा बाबत प्रतिपूर्ती मोबदला मंजूर निविदा दरानुसार नगरपरिषदेस अदा करणे मक्तेदारास यांचेवर बंधनकारक असेल. सदर मोबदला होणा-या मासिक देयकातून वजावट करण्यात येईल.

५) **वाहन दुर्घटना झाल्यास होणा-या खर्चास, जीवीत हानिस व कामगाराच्या दुखापतीस सावदा नगरपरिषद जबाबदार राहणार नाही.**

६) नगरपरिषदेने घनकचरा वाहनावर GPS यंत्रणा बसविलेली असून सदर यंत्रणा कार्यान्वित राहील त्यात काही छेडछाड होणार नाही यांची जबाबदारी मक्तेदाराची राहील व याबाबत होणा-या नुकसानीस मक्तेदार जबाबदार राहील. शहरातील ठरवून दिलेल्या मार्गाप्रमाणे एक किंवा त्यापेक्षा जास्त कचरा संकलन करणारी वाहने बंद राहिल्यास प्रतिदिनी/ प्रतिवाहन रु.५००/- दंड बिलातून केला जाईल. तसेच या बाबत आवश्यक असणारे GPS यंत्रणे संबधीत तांत्रिक बाबी, त्यामधील सीम कार्डच्या सेवा विषयक बाबी ठेकेदारास स्वखर्चाने पूर्ण करून देणे बंधकारक राहील. ठेकेदाराकडील कर्मचा-यास नगरपरिषदेकडे कायमस्वरुपी नोकरी मागण्याचा अधिकार राहणार नाही.

७) सावदा शहराचा विस्तार पाहता अतिरीक्त वाहनांची आवश्यकता राहील सदर वाहने मक्तेदारास स्वखर्चाने उपलब्ध करून दयावे लागेल. कचरा संकलनासाठी वापरणेत येणाऱ्या वाहनांचा इंधन, ड्रायव्हर, कर्मचारी व दुरुस्तीचा खर्च मक्तेदारास करावा लागेल. मक्तेदाराने उपलब्ध करून दिलेली वाहने घर ते घर संकलन करण्यासाठी वापरल्यास GPS प्रणाली, ऑडीओ क्लीप लाऊड स्पीकर यंत्रणांनीशी असावी.

**इतर अटी व शर्ती :-**

१) घन कचरा हाताळणी व व्यवस्थापन अधिनियम २०१६ चे पालन करावे लागेल.

२) निविदा धारकाने शहराच्या संपुर्ण शहर स्वच्छतेबाबत शहराचे संपुर्ण सर्वेक्षण करून नागरी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २०१६ नुसार व स्वच्छ भारत अभियानाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार, शहर स्वच्छता कृती आराखडा आरोग्य निरिक्षक व शहर समन्वयक यांच्या मदतीने तयार करून सादर करावयाचा आहे.

३) आपण सादर केलेल्या कृती आराखड्यानुसार, शहरातील कचरा संकलन करताना कचरा १००% वेगवेगळा (ओला , सुका व घरगुती घातक) गोळा करून त्याची स्वतंत्ररित्या वाहतूक करणे व त्याची शास्त्रशुद्ध पद्धती कंपोष्ट खत करणे तसेच विल्हेवाट करणे मक्तेदारावर बंधनकारक आहे.

४) नगरपरिषद लेखी निर्देश देईल त्यावेळेसच निविदेतील काही कामे करावे लागतील. विनानिर्देश काम केल्यास कामाचा मोबदला मिळणार नाही. आपत्कालीन परिस्थितीत दैनंदिनी कामे स्थगित करून नगरपरिषद निर्देश देईल ती कामे वेळेचे बंधन न पाळता पुर्ण करणेची जबाबदारी मक्तेदारावर राहील.

५) नागरिकांच्या तक्रारीचे निवारण तात्काळ करण्यात यावे.

६) आलेल्या तक्रारी व निवारण केलेल्या तक्रारींचे दैनंदिन नोंदी ठेकेदार स्वत: ठेवतील व सदरचा अहवाल नगरपरिषदेस सादर करतील.

७) घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम, २०१६ नुसार अंमलबजावणी करण्यासाठी दैनंदिन पर्यवेक्षणासाठी नगरपरिषदे मार्फत नियुक्त अधिकारी वर्ग व मुकादम नेमण्यात आलेला आहे. याशिवाय मक्तेदाराने सदर कामी योग्य प्रशिक्षीत निरीक्षक व मुकादम नेमणे बधंनकारक आहे.

८) आपल्या अधिपत्याखालील कर्मचारी यांची नावाची यादी, फोटो व वाहनचालकाचे वाहन चालविणेचा परवाना करारनामा करतेवेळी सादर करणे बंधनकारक राहील.

९) आपल्या अधिपत्याखालील सर्व कर्मचाऱ्यांना शासनाच्या दिशानिर्देशानुसार ड्रेस कोड-युनी फार्म, ओळख पत्र, सुरक्षा साहित्या जसे मास्क, हॅन्ड ग्लोव्हज, गमबुट, रेनकोट, गणवेश, वैद्यकीय सुविधा तसेच साफसफाई करणाऱ्या कामगारांना कामानुसार लागणारे सफाई साहित्य व अनुषंगीक साहित्य पुरविणे मक्तेदारावर बंधनकारक राहील. त्यासाठी नगरपरिषद स्वतंत्र मोबदला देणार नाही. तसेच सदर साहित्य स्वच्छता निरीक्षक यांच्या उपस्थितीत देणे बंधनकारक राहील.

१०) नगरपरिषदेला पुरविलेल्या कर्मचाऱ्यांना (कामाच्या कालावधीपर्यंत) विमा संरक्षण द्यावे लागेल. तसेच वर्क मेन्स कॉम्पेंसेशन कायद्याप्रमाणे दुखापत झाल्यास अगर कामावर मयत झाल्यास योग्य तो मोबदला ठेकेदारास द्यावा लागेल. त्यासाठी नगरपरिषद सावदा यांचेकडे कोणतेही दायीत्व राहणार नाही. हि संपूर्ण जबाबदारी मक्तेदाराची राहील. तसेच घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत नगरपरिषद मालकीच्या अथवा मक्तेदाराने भाडेतत्वावर लावलेल्या वाहनाकडून अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मक्तेदाराची राहील.

११) साथीच्या रोगाचा काळात (उदा. कोव्हिडा-१९) आवश्यक सामग्री पुरविणे बंधनकारक आहे जसे मास्क, हॅन्ड ग्लोव्हज, गमबुट, रेनकोट, गणवेश, वैद्यकीय सुविधा इ.तसेच आपल्या कडील कामगारांना आवश्यक साधन सामग्री पुरविणे बंधनकारक आहे.

१२) घन कचरा व्यस्थापन करतांना साफसफाई किंवा घर ते घर कचरा संकलन कामी शहरात असलेले कचरा वेचक यांना मक्तेदाराने आपल्या कामात समाविष्ट करून घ्यावे .

१३) अभिकर्त्याने ठेक्यावरील कर्मचा-यांची भविष्य निर्वाह निधी खाती, विमा खाती तसेच विमा खाती उघडुन त्याची वर्गणी व मक्तेदाराचे अंशदान भरण्याची जबाबदारी अभिकर्त्याची ( मक्तेदाराची) राहील व कामगाराच्या ई.पी.एफ. भरणा करून त्याच्या छायांकित प्रति प्रत्येक महिन्यास बिलासोबत जोडणे बंधनकारक आहे व सदर बाबतचा दर महिन्याला स्वाक्षांकीत प्रतीसह हिशेब नगरपरिषदेस दाखल देयकासोबत अवगत करावा लागेल.

१४) आपल्या अधिपत्याखालील सेवा पुरविणेकामी कार्यरत यंत्रणेवर अनुज्ञेय लाभ दरमहा वेळेवर देणे मक्तेदार यांचेवर बंधनकारक आहे. त्याबाबत दरमहा देयकासोबत तपशिल पूर्तता अहवाल सादर करणे मक्तेदारावर बंधनकारक असेल अन्यथा पुढील देयक अदा केले जाणार नाही. तसेच प्रशासकीय/ अन्य कारणाने बिल अदा करण्यास विलंब झाल्यास मक्तेदाराने कार्यरत यंत्रणेस (त्याच्या कर्मचा-यांस ) कामाचा मोबदला/वेतन न थकविता नियमितपणे ठरलेल्या वेळेत देणे बंधनकारक आहे व त्याचा दैनंदिन कामावर परिणाम होवू न देण्याची जबाबदारी सर्वस्वी मक्तेदाराची राहील. मक्तेदाराच्या कर्मचारीचा संप वगैरे झाल्यास त्यात नगरपरिषद सावदा कोणताही हस्तक्षेप करणार नाही.

१५) किमान वेतन कायद्याची तसेच मजुर व कारागीर या संबंधी अस्तीत्वात असलेल्या इतर कायद्याबाबत पालन करण्याचे सर्वस्वी जबाबदारी आपणांवर राहील. काम करतांना शासनाचा इतर सर्व कायद्यांचे पालन करणे आपणांस बंधनकारक असेल.

१६) आपणांस कामासाठी बालमजुर लावता येणार नाही.

१७) मक्तेदाराने निविदा भरतांना संपुण शहराची पाहणी करूनच मक्त्याचे दर भरावे. मंजुरी अंती कोणतीही सुट दिली जाणार नाही व काम न केल्यास नगरपरिषदेच्या काळ्या यादीत टाकण्यात येईल.

१८) नगरपरिषदेने सुचविलेल्या ठिकाणी पुर्ण वेळ तक्रार निवारण कक्ष स्थापन करून या ठिकाणी पुर्ण वेळ कर्मचारी नेमणुक करावा व सर्व प्राप्त तक्रारी यांचे झालेले निरसन दैनंदिन रित्या केलेले काम (न.पा. नमुन्यात) यांची संपुर्ण नोंद ठेवावी व दैनंदिन रित्या आरोग्य विभागास सादर करावी.

१९) तक्रार निवारण कक्षात एक पुर्णवेळ चालेल असा सपंर्क क्रमांक उपलब्ध करून दयावा हा सपंर्क क्र. आपल्या सर्व वाहंनावर स्वच्छतेच्या सुचनांसह प्रदर्शित करण्यात यावा जेणे करून सर्व नागरिकांना तक्रार निवारण कामी संपर्क साधता येईल.

२०) नगरपरिषदेच्या आवश्यकतेनुसार वेळोवेळी कामात केलेले बदल आपणास सुचविण्यात येतील व त्यानुसार अंमलबजाणी करणे आपणावर बंधनकारक राहतील.

२१) कामकाजाच्या दरम्यान कुठलाही वाद अथवा कायदेशीर बाब उदभवल्यास नगरपरिषद सावदा, जो कायदेशीर निर्णय देतील तो मक्तेदारास बंधनकारक असेल.

२२) घर ते घर कचरा संकलन वगळता इतर कामाबाबत त्रुटी बाबत प्रती दिवस रक्कम रुपये ५००/- पर्यंत दंड केला जाईल.

२३) भविष्यात कामासंबंधी लेखा परीक्षणात आक्षेप व त्रुटी आढळुन आल्यास त्या बाबत पुर्तता करण्याची संपूर्ण जबाबदारी मक्तेदाराची राहील.

२४) शासकीय नियमानुसार बिलातून कपाती करण्यात येईल.

२५) काही कारणास्तव देयक अदा करणेस विलंब झाल्यास सदर देयकावर व्याज देय असणार नाही. किंवा मक्तेदार सदर व्याजाची मागणी करू शकणार नाही.

२६) आपणास दरमहाचे बिलातुन नियमोचित सुरक्षा अनामत कपात तसेच इतर अनुषंगीक कपाती करण्यात येतील. आपले काम समाधानकारक असल्यास सदरची अनामत लेखापरिक्षण पूर्ण झाल्यानंतर व सविस्तर अटी व शर्ती यातील घर ते घर कचरा संकलन व वाहतूक या घटकातील अट क्र. २६ च्या अनूषंगाने निकालानंतर पूर्तता झाल्यावरच आपणास परत करण्यात येईल. सदर अनामत रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही.

२७) आपणास दिलेले काम (मक्ता) अहस्तंतरणीय असुन इतर मक्तदारास हस्तांतरीत करता येणार नाही.

२८) मंजूर निविदाधारकास योग्य त्या रक्कमेच्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.

२९) उपरोक्त अटी व शर्ती कमी अधिक करणेचा अधिकार, सावदा नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

३०) सदर कामाचा खर्च हा केंद्र सरकारच्या १४ /१५ व्या वित्त आयोगा मधुन होणार असल्याने मा. जिल्हाधिकारी साहेब, जळगाव यांच्या मान्यतेस अधिन राहुन करण्यात येईल यांची नोंद घेण्यात यावी. तसेच पुरेसा निधी उपलब्ध नसल्यास किंवा निधी उशिरा प्राप्त झाल्यास देय अदा करण्यास उशीर झाल्यास मक्तेदारास काम बंद करता येणार नाही.

३१) संकलीत केलेला सुका कचरा

१) प्लास्टीक २) कागद व पुठ्ठा ३) काच ४) धातु ५) लेदर रेक्झीन ६) कापड

यानुसार नगरपरिषदेने सुचवलेल्या ठिकाणी (MRF Center मध्ये) साठवणुक करुन योग्य ती विल्हेवाट लावण्याची प्रक्रिया करणे आवश्यक राहील. व त्याची साठवणूक व विल्हेवाट लावण्या संदर्भातील नोंदी नगरपरिषद सांगेल त्याप्रमाणे लॉगबूकात (Logbook) ठेवणे बंधनकारक राहिल.

३२) आपणास विघटनशील (ओला कचरा) कच-यापासुन सेंद्रीय खत तयार करणेकरीता लागणारे सर्व साहित्य, बायोकल्चर पावडर व मनुष्यबळ स्वत: पुरवावे लागेल. उत्पादीत झालेल्या सेंद्रीय खताची आवश्यक त्या यंत्रणेमार्फत चाचणी करुन घेणे मक्तेदारास बंधनकारक राहील. व हरीत बँड मानांकन मिळविण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करणे बंधनकारक राहील. जोपर्यंत हरीत बँड मानांकन मिळत नाही तोपर्यंत तयार झालेल्या खताच्या प्रत्येक बॅचेची नमुना चाचणी करत राहणे आवश्यक राहील त्यासाठीचा खर्च ठेकेदाराने स्वत: करायचा आहे.

३३) प्रक्रीयेनंतर उरलेले इनर्ट मटेरीअल ची विल्हेवाट न.प. सांगेल त्या ठिकाणी किंवा आपण स्वत: त्याची विल्हेवाट लावावी.

३४) घनकचरा व्यवस्थापन केंद्राच्या परिसरात SWM नियम २०१६ नुसार अनुज्ञेय झाडे / वृक्ष आवश्यक प्रमाणात काम मिळाल्यापासून १ महिन्या अखेर लावणे व त्यांची मंजूर कामाच्या कालावधी पर्यंत देखभाल करणे मक्तेदारास बंधनकारक राहिल.

नगरपरिषद सावदा MUNICIPAL COUNCIL सावदा Savda Dist. Jalgaon जि. जळगाव

मुख्याधिकारी
नगरपरिषद सावदा

वरील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. त्यांचे उल्लंघन झाल्यास मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील याची मला जाणीव आहे.

निविदाधारकाची स्वाक्षरी

नोंदणीकृत संस्थेचे नाव :-

मालकाचे नाव :-

पत्ता :-

भ्रमण ध्वनी क्र. :-

ई मेल :-

संस्थेचा शिक्का :-

**परिशिष्ट (अ)**

**प्रतिज्ञा पत्र**

मी/आम्ही याब्दारे असे नमुद करतो की, महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (१) (आय) व कलम ४४ (१)(ब) तरतुदीच्या ज्या खाली उदधृत केलेल्या आहेत, माहिती आहे. आणि गंभिरपणे नमुद करतो की, नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेच्यावतीने करण्यात येणा-या संविदेमध्ये नगरपरिषदेच्या कोणत्याही कोणताही हिस्सा किंवा हितसंबध किंवा आमच्याशी भागीदारी नाही.

**कलम १६ (१) (आय)**:- यापुढे तरतुद केली असेल त्याव्यतिरीक्त, नगरपालिकेच्या आदेशावरून केलेल्या कोणत्याही कामात किंवा नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेव्यक्तीने केलेल्या कोणत्याही संविदेत जिचा स्वत:चा किंवा आपल्या भागिदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबध असेल.

**कलम ४४ (१) (ब)** :- पालिका सदस्य म्हणुन किंवा नगरपालिकेच्या कोणत्याही समितीचा सदस्य म्हणुन ज्या कोणत्याही बाबतीत कलम १६ चे पोट कलम (३), खंड (अ), (ब), (क), (इ) व (ग) मध्ये वर्णन uकेल्याप्रमाणे त्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने कोणताही हिस्सा किंवा हितसंबध असेल- मग अशा हिश्श्याची किंवा हितसंबधाची किंमत काहीही असो, किंवा जीत अशीलाच्या, प्रकर्त्याच्या किंवा इतर व्यक्तिंच्यावतीने व्यावसायिकदृष्ट्या त्याचा हिस्सा किंवा हितसंबध असेल अशा कोणत्याही बाबतीत मतदान करील.

निविदाधारकांचे नांव :-------------------------------------

पत्ता :- ----------------------------------------------- निविदाधारकाची सही

दिनांक :-

साक्षिदाराचे नांव :- -------------------------------------

पत्ता :- ----------------------------------------------- साक्षिदाराची सही

दिनांक :-

# निविदाकारांची हमी

मी / आम्ही या व्दारे सावदा नगरपरिषदेस हमी देतो की, माझा/ आमचा कामकाज प्रदान करण्यात येणा-या प्राधिका-या बरोबर कोणताही प्रकाराचा हितसंबंधाचा संघर्ष नाही. तसेच मी / आम्ही सदर कामासाठी एकच निविदा भरलेली आहे. तरी स्वीकृत होण्यास विनंती.

निविदा धारकांचे नांव :- ---------------------------------------- निविदा धारकाची सही

## ANNEXURE – I I

## SELF-DECLARATION

I / We ............................................ age...... Years

occupation business receding at

..........................................................................do hereby state on oath as

under :-

That I / We am/ are proprietor / Director / Partner / Power of

Attorney Holder of The company name as follow,

M/s.....................................................................Having its address

at...............................................................................That I/We

further say that Name of Organization

.................................................................... is not black listed by any

Government / Semi Government Organization / any Local bodies and any other Private

bodies.

Whatever information and documents submitted for registration

are true and correct as per my knowledge. I take full responsibility regarding

genuineness of documents submitted by my.

Date :-
Place :-

(Signature)
(Name of Bidder)
In proprietorship firm
Or
(Name & Designation)

# सावदा नगरपरिषद, सावदा, जि. जळगांव

## अभिकर्त्याने भरावयाचे प्रस्तावित निविदा दर

| अ.क्र. | कामाचे वर्णन | युनिट |
|---|---|---|
| १ | प्रत्येक घरातून तसेच दुकाने, भाजीपाला मार्केट, हॉटेल्स, शासकीय/ निमशासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था मंगल कार्यालये, इ. व्यापारी क्षेत्र येथून वर्गीकृतरित्या कचरा (म्हणजेच ओला व सुका असा कचरा विलगीकरण करुन) वर्गीकृतरित्या संकलित करुन नगरपरिषदेने नेमुन दिलेल्या ठिकाणी शास्त्रोक्त पध्दतीने वाहून नेणे (ड्रायव्हर, डिझेल, कर्मचारी ई. खर्चासह) पुरेशा घंटागाड्या लावणे आवश्यक राहील (म्हणजेच न.प. मालकीच्या घंटागाड्या व मक्तेदाराने आवश्यक इतक्या घंटागाड्या आपल्या स्तरावरुन लावायच्या आहेत.)- (प्रत्येक घंटागाडीवर १ ड्रायव्हर व १ किंवा आवश्यक इतके मजूर ) | प्रति टन |
| २ | सार्वजनिक कचरा कुंड्या, शहरातील कचऱ्याचे ढिग, लहान मोठे गटारी व लहान मोठे नालेतील गाळ, आदी ठिकाणचा दररोज कचरा गोळा करुन बंदिस्त शास्त्रोक्त पध्दतीने वाहनाव्दारे गोळा करुन घनकचरा प्रक्रिया केंद्रापर्यंत वाहून नेणे व विल्हेवाट लावणे | प्रति टन |
| ३ | सावदा नगरपरिषदेच्या गट नं. १४०७ येथील घनकचरा प्रक्रिया केंद्र चालविणे. ओला कचरा शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करुन खत निर्मिती करणे. तसेच सुका कचरा रिसायक्लिंसाठी (पूनर्वापरासाठी) पाठविणे (कर्मचारी, रसायने, आवश्यक साहीत्य ई. खर्चासह) (ओला, सुका कचरा व घरगुती घातक कचरा) (Providing Services for Operation and maintenance of Compost Plant including Labour, Culture, Machinery Operation, Electricity, Water etc.) | प्रति टन |
| ४ | sweepers For night sweeping ( half day ) & other sanitation works | प्रति कर्मचारी / अर्धा दिवस |
| ५ | **नगरपरिषदेच्या साधनांचा परतावा करणे.** | |
| ५.१ | नगरपरिषदे मार्फत पुरविण्यात येणाऱ्या घनकचरा प्रक्रिया केंद्रावरील यंत्र सामुग्री वापरण्याचे भाडे. (देखभाल दुरुस्ती सह) Weigh Bridge, Simple Processing Machine, Plastic Bailing Machine (एकत्रितरित्या) | प्रति महिना |
| ५.२ | घनकचरा प्रकल्पावरील अस्तित्वातील मटेरीयल रिकव्हरी फॅसिलीटी सेंटर मधील सुका कचऱ्याच्या विलगीकरणातून मिळालेले घटक जसे धातू, प्लास्टीक, काच, रबर, कागदी पुठ्ठे व कागद यांच्या विक्रीतून | प्रति महिना |
| ५.३ | ओल्या कचऱ्यापासुन तयार करण्यात येणाऱ्या सेंद्रीय खताच्या विक्रीतून नगरपरिषदेस मोबदला देणे. | प्रति महिना |
| ५.४ | **नगरपरिषदे मार्फत पुरविण्यात येणा-या वाहनांचा मोबदला** (lumsum Amount)<br>(डिझेल, ऑईल, ड्रायव्हर व इतर देखभाल दुरुस्ती ही ठेकेदाराकडे राहिल) | |
| ५.५ | मोठे ट्रॅक्टर | प्रति नग प्रति महिना |
| ५.६ | छोटे ट्रॅक्टर | प्रति नग प्रति महिना |
| ५.७ | घंटागाडी ( Three wheeler/ Four wheeler ) | प्रति नग प्रति महिना |
| ५.८ | JCB (२DX Backhoe Loader) | प्रति नग प्रति महिना |

वरील पैकी निविदेतील नमूद कामापैकी कोणते काम द्यावे हे नगरपरिषद ठरविल, कार्यादेशाप्रमाणेच कामकाज करणे आवश्यक राहिल.

उपरोक्त वाहनांची व मशिनरीची देखभाल व दुरूस्ती करण्याची जबाबदारी करारनामा लिहुन देणार (ठेकेदार) यांची राहील. तसेच भविष्यात नगरपरिषदेने खरेदी केलेली वाहने व यंत्र सामुग्री यांचे दर करारनामा लिहुन देणार (ठेकेदारास) यांना कळविण्यात आल्या नंतर सदरची वाहने व यंत्र वापरणे व त्याची देखभाल व दुरूस्ती करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

निविदा धारकांचे नाव, सही व शिक्का

Signature Not Verified

Digitally signed by Bhushan Vijay Varma
Date: 2026.05.13 15:55:37 GMT-09:30
Location: Maharashtra-MH